पुढारी फु.पा.१

# पोलीस असल्याचे सांगून महिलेची फसवणूक

**मिरारोड :** मिरारोड - नायगाव पोलीस ठाणे हद्दीतील ज्युचंद्र नायगाव येथे राहणाऱ्या दिपाली विनीप मसुरकर (६१) या त्यांच्या नातवाला शाळेतून घरी आणण्यासाठी जात असताना रस्त्यात दोन अनोळखी इसमांनी पोलीस असल्याचे सांगून महिलेची फसवणूक करत त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत घेऊन फरार झाले आहेत. त्याप्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्युचंद्र, नायगाव येथे राहणाऱ्या दिपाली मसुरकर यांचा मुलगा व सून हे कामाला जात असल्यामुळे त्या नातवाला शाळेत आणण्यासाठी जातात. दिपाली यांचा नातू मयांक याची शाळा सकाळी १० वाजता सुटणार असल्यामुळे त्या गुरुवारी सकाळी साडे नऊ वाजता अवर लेडी हायस्कूल, नायगाव पूर्व या शाळेत जात होत्या. त्या रस्त्याने पायी जात असतांना डॉन बॉस्का शाळेच्या समोर 'आल्यानंतर दोन अनोळखी इसम मोटारसायकलवर त्यांच्याजवळ आले व त्यांना म्हणाले की, अम्ही पोलीस आहोत व तुम्ही गळ्यामध्ये सोन्याची पोत पालून फिरू नका नाहीतर तुम्हाला ५ हजार रुपये दंड पडेल. असे बोलल्यामुळे दिपाली या



घाबरून गेल्या. त्यावेळी त्यांनी घाबरून गळ्यातील पोत काढून प्लास्टिक बॅगमध्ये ठेवली. त्यावेळी मोटारसायकलवर बसलेला व्यक्ती मला म्हणाला की, हे मोठे साहेब आहेत, ते सांगतील ते ऐका. त्यानंतर त्या इसमानी दिपाली यांच्या बॅगमध्ये ठेवलेली पोत काढून घेतली व ते फरार झाले.

पुढारी पा.नं.५.

# मस्जिद समोर धार्मिक घोषणा देणाऱ्या ९ जणांना अटक

**मीरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा रोडच्या नयानगर भागातील एका मस्जिद समोर दुपारची नमाज संपल्यानंतर काही जणांनी भगवे झेंडे फडकावत धार्मिक घोषणा दिल्या. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक पोलिसांनी प्रकरण शांत करत झेंडे फडकवणाऱ्या व धार्मिक घोषणा देण्याऱ्यांवर गुन्हा दाखल करून ९ जणांना अटक केली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

मीरा रोडचा नयानगर परिसरात मुस्लिम समुदायाची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. त्यांचा पवित्र रमजान महिना सुरू आहे. दुपारी १ ते २ दरम्यान नमाज अदा केली जात असल्याने पोलीस त्या ठिकाणी गस्त घालत असतात. गुरुवारी दुपारी दोन च्या सुमारास लोढा रस्त्यावरील मोहम्मदी मस्जिदसमोर काही इसम भगवे झेंडे घेऊन धार्मिक घोषणा देऊ लागले. त्यातील दोघांना तेथील रहिवाशांनी पकडले. त्यावेळी तेथे गस्तीवर असलेले पोलीस पोहोचले. त्यावेळी त्यांना रहिवाशांनी सांगितले की, नमाजसाठी लोक आलेले असताना दुचाकीवरून हातात भगवे झेंडे घेऊन आलेल्या तरुणांनी जाणीवपूर्वक मुस्लिम बांधवांकडे पाहून जोराने हॉर्न वाजवून धार्मिक घोषणा देऊ लागले . त्यामुळे लोकांनी एका दुचाकी वरून जाणाऱ्या दोघांना पकडले तर बाकीचे सर्व पळून गेले . तेव्हा पोलिसांनी त्या दोघांना पकडून पोलीस ठाण्यात आणले . त्यानंतर तत्काळ गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. बुधवारी देखील असाच प्रकार घडला होता. दोन्ही घटनांचा पोलिसांनी तपास करून गुरुवारी ९ जणांना अटक केली आहे. स्थानिक मुस्लिम बांधव संतप्त होऊन जमावाने जमले मात्र त्यांनी शांतता राखली शिवाय पोलिसांनी त्यांची समजूत काढली व आरोपींना लगेच अटक केल्यामुळे वाद टळला. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना त्वरित अटक केली.

पुण्यनगरी पु.पा.१.

# एटीएममधून पैसे काढून देतो असे सांगून फसवणूक करणाऱ्या दोघांना अटक

**मीरा रोड :** पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत एटीएम मशीनमधून पैसे काढून देण्याचा बहाणा करून हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करून फसवणूक करणाऱ्या दोघांना विरार गुन्हे शाखा कक्ष ३ यांनी अटक केली. आरोपींकडून दीड लाख रुपये जप्त करण्यात आले असून, त्यांनी केलेले ६ गुन्हे उघडकीस आले आहेत.



नालासोपारा पूर्वेच्या धानीवबाग येथे राहणाऱ्या रोहित रामानंद राय (१९) हा धानीवबाग तलावाच्या समोर असलेल्या हिताची एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेला असता, दोन अनोळखी व्यक्तींनी एटीएम सेंटरमध्ये येऊन त्याला बोलण्यात गुंतवून त्याचे एटीएम घेऊन ४४ हजार रुपये काढले. तसेच एटीएम सेंटरमध्ये आलेल्या आणखी एका व्यक्तीचे १९ हजार रुपये काढून फसवणूक केली. त्याबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासून एटीएम सेंटरमधून पैसे काढून देण्यासाठी मदतीचा बहाणा करून हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करून फिर्यादीचे परस्पर एटीएम मशीनमधून पैसे काढून घेण्याच्या घटनेत वाढ झाली होती. या घटनांची वरिष्ठांनी दखल घेतली असून, आरोपींचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांच्याकडे सोपविण्यात आला होता. गुन्हे शाखा कक्ष ३, विरार चे पो.नि. प्रमोद बडाख व त्यांच्या पथकाने तपास करून आरोपी साहील सलीम शेख, सागर अभिजीत मंडल यांना दोघांना बांद्रा येथून अटक केली. त्यांनी गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व गुन्ह्यातील फसवणूक केलेले दीड लाख रुपये जप्त केले. अटक आरोपी यांच्याकडे अधिक तपास केला असता, त्यांनी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाण्यांत ६ गुन्हे केल्याचे उघडकीस आले. तसेच अटक आरोपी यांच्या विरुद्ध मुंबईतील अंधेरी, भायखळा, डी. एन. नगर, साकीनाका, मालवणी या पोलीस ठाण्यांमध्ये यापूर्वी १२ गुन्हे दाखल आहेत. तसेच ठाणे शहरातदेखील अशाच प्रकारे अनेक गुन्हे केले असल्याची माहिती तपासादरम्यान उघडकीस आली आहे.

पुढारी पु.पा.१.

# पाण्याच्या टाकीत पडून मुलाचा मृत्यू

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड पोलीस ठाणे हद्दीतील रामदेव पार्क परिसरात नवीन इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या इमारतीमध्ये नवीन प्लॅट विकत घेतल्यामुळे प्लॅट पाहण्यास गेलेल्या कुटुंबातील आठ वर्षांचा मुलाचा तेथे उघड्या असलेल्या पाण्याच्या टाकीत पडून मृत्यू झाला आहे. त्याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दोघांवर गुन्हा दाखल

मिरारोड येथील रामदेव पार्क परिसरात रोशनलाल मालू यांचे सावलिया एव्हेन्यू या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या इमारतीच्या सातव्या मजल्यावर उमेशकुमार मिश्रा यांनी प्लॅट विकत घेतला आहे. त्या फ्लॅटचे काम पाहण्यासाठी उमेशकुमार हे त्यांचे वडील श्रीनारायण मिश्रा व दोन मुलांसह गेले होते. प्लॅट पाहून झाल्यानंतर त्यांचा आठ वर्षांचा कौशल दिसला नाही. त्याला आजूबाजूला शोधल्यानंतर तो इमारतीच्या आवारात उघड्या असलेल्या पाण्याच्या टाकीत पडलेला आढळला. त्यांनी लगेच मुलाला जवळ असलेल्या रुग्णालयात उपचारासाठी नेले. त्यावेळी डॉक्टरांनी तो मयत झाल्याचे सांगितले. विकासकाच्या निष्काळजीपणामुळे मुलाचा मृत्यू झाला असून मला न्याय मिळाला पाहिजे, असे उमेशकुमार यांनी सांगितले आहे.

याप्रकरणी विकासक रोशनलाल मालू आणि डुंगर मेहरा यांच्याविरोधात मिरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

सामना पा.नं.५.



# शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीचे वय साठ केल्यास चार हजार कोटी वाचणार

## दरवर्षी साठ हजार कर्मचारी निवृत्त | ७५ हजार नोकर भरतीला चार वर्षांचा कालावधी | शासकीय कर्मचाऱ्यांचा दावा

**मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी)** – जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीनंतर आता निवृत्तीचे वय ६० करण्याच्या मागणीसाठी शासकीय कर्मचारी आक्रमक झाले आहेत. राज्य सरकार ७५ हजार नवीन नोकर भरती करणार आहे, पण नवीन नोकर भरती करण्यासाठी चार वर्षांचा कालावधी लागेल. त्याशिवाय सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीचे वय ६० केल्यास सरकारची दर वर्षाला चार हजार कोटी रुपयांची बचत होईल, असा दावा कर्मचारी संघटना करीत आहेत.

जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी १४ ते २० मार्च या काळात बेमुदत संप पुकारला होता, पण सरकारच्या आश्वासनानंतर कर्मचाऱ्यांनी आंदोलन स्थगित केले. यासंदर्भातील पुढील चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अधिकारी महासंघाच्या प्रतिनिधींची 'वर्षा' निवासस्थानी बैठक झाली. केंद्र सरकारप्रमाणे राज्यातील कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय साठ करण्याची मागणी अधिकारी महासंघाने या बैठकीत मांडली. त्यावर प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी महासंघाच्या प्रतिनिधींना दिले.

### अद्याप जीआर नाही

सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपकाळातील वेतन कापणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींना दिले, पण त्याबाबतचा शासन निर्णय (जीआर) अद्याप प्रसिद्ध केलेला नाही.

### निवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या

राज्य सरकारच्या सेवेत सुमारे १९ लाख कर्मचारी आहेत. दरवर्षी ६० हजार कर्मचारी निवृत्त होतात. सरकारने ७५ हजार पदे भरण्याची घोषणा केली आहे, पण सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार एक वर्षात नवीन भरती एकूण पदसंख्येच्या चार टक्के करता येते. त्यामुळे ही नोकर भरती करण्यासाठी चार वर्षांचा कालावधी लागेल. निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांना साठ लाख रुपये निवृत्ती निधी द्यावा लागतो. परिणामी ६० हजार कर्मचाऱ्यांवर सरकारला दर वर्षाला ३ हजार ६०० कोटी रुपयांचा बोजा येतो. ते पाहता निवृत्तीचे वय साठ केल्यास सरकारचे दरवर्षी चार हजार कोटी रुपये वाचतील असे कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी सांगतात.

---

लोकमत पा.नं.४.

# म्यानमारमध्ये बंदिस्त केलेल्या भाईंदरच्या तरुणाची सुटका

## थायलंडमध्ये नोकरीच्या नावाने फसवणूक, एजंट विरोधात होणार कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** थायलंड येथे नोकरीसाठी पाठवून तेथून म्यानमार देशात जबरदस्तीने पाठवून म्यानमारमध्ये छळ करत कामास जुंपलेल्या भाईंदरच्या तरुणाची सुटका करून पोलिसांच्या भरोसा सेलने त्याला पुन्हा मायदेशी आणले आहे, तर परदेशात नोकरी देतो सांगून फसवणूक करणाऱ्या एजंटवर कारवाईसाठी पोलिसांनी तयारी चालवली आहे.

भाईंदरच्या उत्तन येथे राहणाऱ्या परवीन शेख यांनी भाईंदरच्या भरोसा सेलकडे तक्रार दिली होती. त्यांचा मुलगा शहजान (२५) याला ठाण्यातील एजंटने थायलंड येथे नोकरी देतो सांगून पैसे घेतले. गेल्या वर्षी ४ नोव्हेंबरला एजंटने शहजानला आधी चेन्नई विमानतळावर पाठवले. तेथून पर्यटक व्हिसाद्वारे थायलंडमध्ये नोकरीसाठी पाठवले, मात्र थायलंड येथे तो पोहोचल्यावर त्याला तेथे नोकरी न देता तेथून बेकायदेशीररीत्या लगतच्या म्यानमार देशात बळजबरीने पाठविण्यात आले. त्याचा मोबाइल काढून घेत म्यानमारमधील एका कंपनीत कॉलिंग करण्याचे काम दिले. दिलेले लक्ष्य पूर्ण केले नाही, तर त्याचा अमानुष छळ केला जात असे. २८ दिवसांनी त्याला मोबाइल अर्ध्या तासासाठी दिल्यावर त्याने आई परवीन हिला कॉल करून झालेली फसवणूक व केला जाणारा छळ आदींची माहिती दिली. शहजान नेमका कुठे आहे याची माहिती होत नव्हती. त्याच्यासोबत कोणताही संपर्क होत नसल्यामुळे तो नक्की कुठे आहे व कोणत्या परिस्थितीमध्ये आहे, याबाबत परवीन यांना कोणतीही माहिती नव्हती. भाईंदर भरोसा सेलच्या प्रमुख सहायक निरीक्षक तेजश्री शिंदे यांनी गुन्हे शाखेचे उपायुक्त अविनाश अंबुरे व सहायक आयुक्त अमोल मांडवे यांच्या निदर्शनास प्रकार आणून दिल्यावर त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदे, सेलचे सचिन तांबवे, आफ्रिन जुनैदी यांनी तपास सुरू केला. शिंदे यांनी भारतीय दूतावासाशी संपर्क साधून त्यांच्या मदतीने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून शहजानची म्यानमार येथून सुटका केली. ३० मार्चला तो मायदेशी सुखरूप परतला.

### नोंदणीकृत एजंट असल्याची खात्री करा

१ परराष्ट्र मंत्रालयाच्या अखत्यारीत परदेशात नोकरीसाठी जाणाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रोटेक्टर्स ऑफ इमिग्रंटसचे कार्यालय वांद्रे येथे आहे. परदेशात नोकरीसाठी पाठविणारे एजंट हे नोंदणीकृत असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

२ परदेशात नोकरी देतो सांगून फसविणारे आणि पुशिंगच्या माध्यमातून अन्य देशात बेकायदा पाठवण्याच्या घटना घडत असल्याने नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन भरोसा सेलच्या तेजश्री शिंदे यांनी केले आहे.

CamScanner

लोकमत पु.पा.३०

# मशिदीजवळ घोषणा देणारे तिघे अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या नया नगरच्या मुस्लिमबहुल भागातील धार्मिक स्थळांजवळ भगवे झेंडे फडकवणे, धार्मिक घोषणा देण्याचे प्रकार सुरूच असून शुक्रवारी पहाटे चारचाकी गाडीतून येऊन शम्स मस्जिदजवळ घोषणा दिल्याप्रकरणी तिघा तरुणांना नया नगर पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान गुरुवारी अटक केलेल्या आठ आरोपींना १० एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे.

रमजान सुरू असतानाच असे प्रकार पहिल्यांदाच सुरू झाल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे, मात्र वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र वनकोटी आणि पोलिस अधिकारी-कर्मचारी यांची वाढती गस्त आणि तातडीने गुन्हे दाखल करून आरोपींना अटक केली आहे. दुसरीकडे मुस्लिम बांधवानी शांतता राखत सामंजस्य दाखवल्याने अनुचित घटना घडलेली नाही.

बुधवारी, ५ एप्रिलच्या पहाटे महंमदीया मदरसा जवळ तिघांनी भगवे झेंडे घेऊन धार्मिक घोषणा दिल्या. गुरुवारी मोहम्मदी मस्जिदजवळ नमाजदरम्यान दुचाकीवरून आलेल्या सहा तरुणांनी झेंडे फडकवत धार्मिक घोषणा दिल्या असता दोघांना नागरिकांनीच पकडले होते, मात्र त्यांना मारहाण न करता पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले होते. बुधवार आणि गुरुवारच्या घटनेप्रकरणी नऊ आरोपींना पोलिसांनी गुरुवारी पकडले. आरोपी हे १७ ते २६ वयोगटातील तरुण आहेत. एक आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला अटक करण्यात आली नाही. अन्य आठ आरोपींना शुक्रवारी ठाणे न्यायालयात हजर केले असता सर्वांना १० एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## पोलिस तपास सुरू

शुक्रवारी पहाटे साडेचारच्या सुमारास नया नगरमधील शम्स मस्जिदजवळ गाडीतून आलेल्यांनी धार्मिक घोषणा दिली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तत्काळ गुन्हा दाखल करून ओमकार सुनील धाकतोडे (वय २३, रा. श्री शांतीवन), क्रिस्टीन संतोष शेट्टी (१८, रा. असोपालव), पूनम गार्डन व जेसल मनोज साळोखे (१८, रा. हिरको एमीन्स) काशिमीरा पोलिस ठाण्याजवळ यांना अटक केली. अटक केलेल्यांकडून मोबाइल जप्त करण्यात आले असून ते कोणाकोणाच्या संपर्कात होते वा कोणाच्या चिथावणीवरून हा प्रकार केला आदींचा तपास जितेंद्र वनकोटी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करत आहेत.

# पोलिस परीक्षेतील उत्तरपत्रिका घेऊन उमेदवार पसार

लोकमत न्यूज नेटवर्क

**भाईंदर :** पोलिस भरती प्रक्रियेत लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेला उमेदवार चक्क उत्तपत्रिका घेऊन परीक्षा केंद्रातून पसार झाल्याचे उघड झाले आहे. राहुल अर्जुन जगताप असे उमेदवाराचे नाव असून त्याच्याविरोधात भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

मीरा-भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या कार्यालयामार्फत महाराष्ट्र पोलिस भरती २०२१ अंतर्गत २ एप्रिलला पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेवेळी हा धक्कादायक प्रकार घडला आहे. लेखी परीक्षेसाठी १२,१२७ उमेदवार पात्र ठरले होते. त्यातील ८,८५८ पुरुषांपैकी ७,७२१, तर ३,२६९ महिलांपैकी २,२७८ उमेदवार लेखी परीक्षेला हजर होते. नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात पुरुषांसाठी, तर स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदानात ही परीक्षा झाली. जगताप याने त्याची उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे जमा न करता ती सोबत घेऊन गेला. त्याच्यावर भाईंदर पोलिस ठाण्यात कलम ४०३,४०६ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


CS CamScanner

लोकसत्ता पा.नं.१५.

# वसई पूर्वेतील गावपाड्यांत पाणीटंचाई

## महापालिकेकडून टँकरने पाणीपुरवठा

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**वसई :** उन्हाच्या झळा बसू लागताच वसई पूर्व भागातील गावपाड्यांना पाणीटंचाई जाणवू लागली आहे. त्यामुळे वसई-विरार महापालिकेने तेथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. प्रभाग समिती 'जी' व 'एफ' मध्ये दररोज टँकरच्या २८ फेऱ्या होत आहेत.

वसई पूर्वेच्या भागातील काही गावांमध्ये अजूनही पालिकेच्या जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा होत नाही. यात कामण, चिंचोटी, कोल्ही, देवदल, सागपाडा यासह पेल्हार प्रभाग समितीच्या अंतर्गत येणाऱ्या गावांचा समावेश आहे. उन्हाळा सुरू होताच दरवर्षी या भागांतील नागरिकांना पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागते. बोअरवेल, विहिरी, तलाव हे या भागांतील जलस्रोत आहेत. उन्हाळ्यात त्यांची पातळी खालावत असल्याने त्याचा मोठा फटका या भागातील नागरिकांना बसतो.

सध्या पाणीटंचाईच्या झळा बसू लागल्याने पालिकेने या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी केली होती. अखेर पालिकेने वसई पूर्वेतील प्रभाग समिती 'जी' व 'एफ' अंतर्गत येणाऱ्या गावपाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. 'जी' प्रभागामध्ये १३ व पेल्हारमध्ये १५ अशा २८ फेऱ्या प्रतिदिन दिल्या जात असल्याची माहिती पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. तात्पुरता स्वरूपात का होईना, परंतु टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.



**'गुडफ्रायडे' निमित्त वसई-विरार परिसरातील विविध गावांमध्ये चर्चतर्फे मिरवणूक काढण्यात आली. त्यात ख्रिस्ती बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

CamScanner

लोकसत्ता पा.नं.१५.

# चोरलेल्या २१ लाखांच्या मोबाइलचा छडा

गुन्हे वृत्त

## एका आरोपीला अटक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** काशिमीरा येथील पेणकरपाडा येथे झालेल्या २१ लाख ५० हजार रुपयांच्या मोबाइल चोरीचा छडा काशिमीरा पोलिसांनी लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून सर्वच्या सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. टेम्पोमधून आरोपींनी हे मोबाइल चोरले होते.

भाईंदरच्या 'क्रोमा' या प्रसिद्ध दुकानात टेम्पोतून २१ लाख ५० हजार रुपयांचे मोबाइल आणण्यात येत होते. ३० मार्च रोजी काशिमीरा येथील पेणकर पाड्यात हा टेम्पो उभा असताना अनोळखी चोरांनी टेम्पोचे कुलूप तोडून आतील महागडे मोबाइल लंपास केले होते. या प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी तपास सुरू केला होता. पोलिसांनी तब्बल ५०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तपासून चोरांचा माग काढला. या प्रकरणी पोलिसांनी रमेश राजभर याला अटक केली. तर त्याचा साथीदार सुनील मंडल हा फरार आहे. या दोघांनी मिळून हा टेम्पो लुटला आहे. पोलिसांनी गुन्ह्यात लुटण्यात आलेला सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. रमेश राजभर हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरोधात विविध पोलीस ठाण्यात १० हून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे.

काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम, साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत गांगुर्डे यांच्या पथकाने तपास करून हा गुन्हा उघडकीस आणला.

## एटीएम केंद्रात हातचलाखीने फसवणूक

**वसई :** एटीएम केंद्रात मदतीच्या बहाण्याने हातचलाखी करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दोन सराईत चोरांना गुन्हे शाखा ३ च्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून अशा प्रकारे फसवणूक केल्याचे सहा गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

वसई-विरार शहरातील एटीएम केंद्रांमध्ये पैसे काढण्यासाठी आलेल्या नागरिकांची भामट्यांकडून फसवणूक होण्याच्या घटना वाढल्या होत्या. पैसे काढताना मदत करण्याच्या बहाण्याने हातचलाखीने एटीएम कार्डाची अदलाबदली करून नंतर खात्यातून पैसे काढले जात होते. गुन्हे शाखा ३ च्या पथकाने या प्रकरणी तपास करून साहिल शेख आणि सागर मंडल या दोन सराईत भामट्यांना अटक केली. त्यांच्याकडून चोरीच्या गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी तसेच दीड लाख रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या दोघांनी पेल्हार, तुळिंज, शांतीनगर (ठाणे) तसेच उत्तर प्रदेशातील लालपूर पोलीस ठाण्यात केलेल्या एटीएम फसवणुकीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. हे दोन्ही आरोपी सराईत असून त्यांच्याविरोधात मुंबईच्या विविध पोलीस ठाण्यांत १२ फसवणुकीच्या गुन्ह्यांची नोंद आहे.

पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी खाडे, उमेश भागवत आदींनी ही कारवाई केली.

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष : 26 अंक-293 मुंबई, शनिवार 8 अप्रैल 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# लाखों रुपये नगदी के साथ दो शातिर ठग क्राइम ब्रांच 3 के हत्थे चढ़ा, 6 अपराध की गुत्थी सुलझी

**वसई :** एटीएम मशीन से पैसे निकालने का झांसा देकर एटीएम कार्ड की अदला-बदली कर ठगी करने वाले शातिर आरोपी को एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 3 की टीम ने गिरफ्तार कर लिया गया है, आरोपी की गिरफ्तारी से 6 अपराधों (धोखाधड़ी) की गुत्थी सुलझा ली गयी है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 3 पी.आई प्रमोद बड़ाख की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी हैं। पुलिस ने बताया कि, शिकायतकर्ता रोहित रामानंद राय, उम्र-19 साल बिजनेस एजुकेशन, निवासी - धानिवबाग तालाब, नालासोपारा पूर्व में रहता है, 22 मार्च को रात्रि 07:00 से 07:45 बजे के बीच रोहित पैसे निकालने के लिए एटीएम, धानिव बाग तालाब के सामने, नालासोपारा ईस्ट, एटीएम सेंटर गए, तभी दो अज्ञात व्यक्तियों ने आपस में षड़यंत्र कर एटीएम केंद्र पर आकर रोहित से बातचीत की और रोहित की सहमति के बिना धोखे से उसका एटीएम ले लिया, शिकायतकर्ता से 44,000 रुपये की निकासी और एटीएम केंद्र पर आए दूसरे शख्स से 19,000 रुपये की धोखाधड़ी, इस मामले में पेल्हार थाने में अज्ञात आरोपी के ऊपर कलम 420,34 के तहत केस दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्राधिकार में, एटीएम केंद्र से पैसे निकालने में मदद करने के बहाने एटीएम कार्ड को मैन्युअल रूप से बदलकर शिकायतकर्ता की आपसी एटीएम मशीनों से पैसे निकालने की घटनाओं में वृद्धि हुई है। वरिष्ठ अधिकारियों ने उक्त घटनाओं को गंभीरता से लेते हुए आरोपियों का पता लगाने और अपराधों को प्रकाश में लाने के निर्देश और आदेश दिए। तदनुसार उपरोक्त अपराध की जांच क्राइम ब्रांच 3 विरार को सौंपी गई। ब्रांच 3 के पी.आई प्रमोद बडाख व स्टॉफ को अंडरकवर सूचना से प्राप्त जानकारी और तकनीकी विश्लेषण के आधार पर (1).साहील सलीम शेख (2) सागर अभिजीत मंडल को हिरासत में लिया, जब उसे पूछताछ की गई तो पता चला कि उसने उक्त अपराध को अंजाम दिया है, टीम ने 4 अप्रैल को गिरफ्तार कर लिया। गिरफ्तार आरोपियों के पास से अपराध में प्रयुक्त बर्गमैन मोटर साइकिल एवं 1,50,000 रुपये की नकद राशि बरामद की गई है व 6 मामलों का खुलासा हुआ है। पुलिस के मुताबिक, गिरफ्तार अभियुक्तों के विरुद्ध मुंबई सिटी पुलिस कमिश्नरेट एरिया अंधेरी, भायखला, डी. एन नगर, साकीनाका, मालवणी थाने में कुल 12 मामले दर्ज किए गए हैं। साथ ही आरोपी ने जांच के दौरान जानकारी दी है कि उसने यहां ठाणे सिटी पुलिस कमिश्नरेट और पुलिस कमिश्नरेट में इसी तरह कई अपराध किए हैं।




# जिले में कोरोना केस की वृद्धि के साथ ही कोविड उपचार केंद्र तैयार करने का आदेश जारी

**पालघर :** पालघर जिले में कोरोना मरीजों की संख्या बढ़ने की संभावना को देखते हुए प्रशासन कोरोना पर काबू पाने के तैयारी में जुट गई है, इसके लिए कलेक्टर गोविन्द बोडके की अध्यक्षता में विशेष बैठक का आयोजन किया गया एवं समिति की बैठक संपन्न हुई, जिसमें कोविड की समीक्षा की गई। दिन प्रतिदिन मौसम में हो रहे बदलाव के कारण पालघर जिले में इस समय बड़ी संख्या में महामारी की बीमारियां बढ़ रही हैं, हालांकि एचटूनाईन का कोई मरीज नहीं है, लेकिन कलेक्टर ने पालघर जिले में एक कोविड उपचार केंद्र तैयार रखने के निर्देश दिए, फिलहाल बोईसर स्थित टीमा अस्पताल और ग्रामीण अस्पताल पालघर को फिर से खोलने के आदेश दिए गए हैं। कलेक्टर व जिला स्वास्थ्य अधिकारी ने मरीजों से जांच कराने की अपील की है, साथ ही भविष्य में बढ़ते कोरोना के खतरे को देखते हुए कलेक्टर ने स्वास्थ्य व्यवस्था को कोरोना जांच शुरू करने के निर्देश दिए हैं, कलेक्टर ने नागरिकों से अपील की कि बिना घबराए लक्षण होने पर नजदीकी सरकारी अस्पताल में जाकर जांच कराएं, जिले के लोग कोविड गाइडलाइन का पालन करें, भीड़भाड़ वाली जगहों पर मास्क का प्रयोग करें, पढ़ाई के समय नाक और मुंह ढकने के लिए रूमाल का प्रयोग करें, सार्वजनिक स्थानों पर न थूकें, सांस की बीमारियों से पीड़ित होने पर व्यक्तिगत संपर्क सीमित करें, भीड़-भाड़ वाली जगहों पर सह-रुग्णता वाले लोग और बुजुर्ग लोग जाने से बचें।

CS CamScanner

DIGITAL
मुंबई, शनिवार, 8 अप्रैल 2023
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# क्राइम ब्रांच यूनिट 3 ने शातिर ठग को किया गिरफ्तार

## लोगों से एटीएम कार्ड की अदला-बदली कर निकाल लेते पैसे

**प्रवासी संदेश टीम।**

**वसई।** एटीएम मशीन से पैसे निकालने का झांसा देकर एटीएम कार्ड की अदला-बदली कर ठगी करने वाले शातिर आरोपी को एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 3 की टीम ने गिरफ्तार कर लिया गया है। आरोपी की गिरफ्तारी से 6 अपराधों (धोखाधड़ी) की गुत्थी सुलझा ली गयी है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 3 पी.आई प्रमोद बड़ाख की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है। पुलिस ने बताया कि,शिकायतकर्ता रोहित रामानंद राय, उम्र-19 साल बिजनेस एजुकेशन, निवासी - धानिवबाग तालाब, नालासोपारा पूर्व में रहता है,22 मार्च को रात्रि 07:00 से 07:45 बजे के बीच रोहित पैसे निकालने के लिए एटीएम, धानिव बाग तालाब के सामने, नालासोपारा ईस्ट, एटीएम सेंटर गए। तभी दो अज्ञात व्यक्तियों ने आपस में षड़यंत्र कर एटीएम केंद्र पर आकर रोहित से बातचीत की और रोहित की सहमति के बिना धोखे से उसका एटीएम ले लिया,शिकायतकर्ता से 44,000 रुपये की निकासी और एटीएम केंद्र पर आए दूसरे शख्स से 19,000 रुपये की धोखाधड़ी,इस मामले में पेल्हार थाने में अज्ञात आरोपी के ऊपर कलम 420,34 के तहत केस दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्राधिकार में,एटीएम केंद्र से पैसे निकालने में मदद करने के बहाने एटीएम कार्ड को मैन्युअल रूप से बदलकर शिकायतकर्ता की आपसी एटीएम मशीनों से पैसे निकालने की घटनाओं में वृद्धि हुई है। वरिष्ठ अधिकारियों ने उक्त घटनाओं को गंभीरता से लेते हुए आरोपियों का पता लगाने और अपराधों को प्रकाश में लाने के निर्देश और आदेश दिए। तदनुसार उपरोक्त अपराध की जांच क्राइम ब्रांच 3 विरार को सौंपी गई। ब्रांच 3 के पी.आई प्रमोद बडाख व स्टॉफ को अंडरकवर सूचना से प्राप्त जानकारी और तकनीकी विश्लेषण के आधार पर (1) साहील सलीम शेख (2) सागर अभिजीत मंडल को हिरासत में लिया,जब उसे पूछताछ की गई तो पता चला कि उसने उक्त अपराध को अंजाम दिया है। टीम ने 4 अप्रैल को गिरफ्तार कर लिया।गिरफ्तार आरोपियों के पास से अपराध में प्रयुक्त बर्गमैन मोटर साइकिल एवं 1,50,000 रुपये की नकद राशि बरामद की गई है व 6 मामलों का खुलासा हुआ है। पुलिस के मुताबिक,गिरफ्तार अभियुक्तों के विरुद्ध मुंबई सिटी पुलिस कमिश्नरेट एरिया अंधेरी, भायखला, डी. एन नगर, साकीनाका, मालवणी थाने में कुल 12 मामले दर्ज किए गए हैं।साथ ही आरोपी ने जांच के दौरान जानकारी दी है कि उसने यहां ठाणे सिटी पुलिस कमिश्नरेट और पुलिस कमिश्नरेट में इसी तरह कई अपराध किए हैं।




CamScanner

लोकमत




एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दुकलीला गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांनी अटक केली आहे.

# एटीएम कार्ड बदलून लुटणारी दुकली अटकेत

## सहा गुन्ह्यांची उकल : मुद्देमाल हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या सराईत दुकलीला गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपींकडून ६ गुन्ह्यांची उकल करून रोख रक्कम, वेगवेगळ्या बँकेचे तीन एटीएम कार्ड, एक दुचाकी, असा मुद्देमाल हस्तगत केला आहे, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी दिली.

धानिवबाग येथे राहणारा तरुण रोहित राय हा २२ मार्चला संध्याकाळी धानिवबागजवळील एटीएम सेंटरमधून पैसे काढण्यासाठी गेला होता. दोन आरोपींनी त्यांना बोलण्यात गुंतवून एटीएम कार्डची अदलाबदली करून ४४ हजार आणि एकाचे ११ हजार रूपये काढून फसवणूक केली होती. पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. पोलिस आयुक्तालय क्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासून एटीएम सेंटरमधून पैसे काढून देण्यासाठी मदतीचा बहाणा करून हातचलाखीने कार्ड अदलाबदली करून परस्पर मशीनमधून पैसे काढून घेतल्याच्या घटनेत वाढ झाली होती.

त्याअनुषंगाने वरिष्ठांच्या आदेशानुसार तपास गुन्हे शाखेच्या युनिट तीनकडे सोपविला होता. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख व त्यांच्या टीमला गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी साहील सलीम शेख आणि सागर अभिजित मंडल या दोघांना ताब्यात घेऊन तपास केल्यावर गुन्हा केल्याचे उघड झाले. त्यांना ४ एप्रिलला अटक केली आहे. अटक आरोपींकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी व गुन्ह्यातील फसवणूक झालेली दीड लाख रुपयांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

### गुन्हे शाखा युनिट तीनची कामगिरी

ही कामगिरी पोलिस उपआयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलिस उपनिरीक्षक उमेश भागवत, शिवाजी खाडे, पोलिस हवालदार अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव, प्रवीण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव आणि संतोष चव्हाण यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.



CamScanner